सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १९ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## शेतकरी कर्जमाफीला पुन्हा ब्रेक?

### विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे सरकारचा निर्णय अडकला; विलंब होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची मानली जाणारी कर्जमाफी योजना आता आणखी काही काळ लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुती सरकारने सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्याचे आश्वासन दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जून महिन्यापर्यंत कर्जमाफीबाबत निर्णय होईल, असे संकेत दिले होते. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या निर्णयाला विलंब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू झाली आहे. ही निवडणूक बिनविरोध झाली नाही तर २५ जूनपर्यंत आचारसंहिता कायम राहू शकते. सरकारने ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्याचा विचार केला होता. सहकार मंत्रालयाने त्यासाठी प्राथमिक प्रस्तावही तयार केल्याची माहिती समोर आली होती. मात्र, निवडणूक प्रक्रिया सुरू होत असल्याने सरकार मोठे आर्थिक निर्णय घेण्याबाबत सावध भूमिका घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे कर्जमाफीचा प्रस्ताव मंत्रिमंडळात मांडण्यास उशीर होऊ शकतो.

दरम्यान, विधानपरिषद निवडणुकीतील मतदार हे सर्वसामान्य नागरिक नसून महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद तसेच कॅन्टोन्मेंट बोर्डातील निवडून आलेले प्रतिनिधी असतात. त्यामुळे कायदेशीरदृष्ट्या सरकारला कर्जमाफीचा निर्णय घेण्यात अडचण नसल्याचे काही सूत्रांचे म्हणणे आहे. तरीसुद्धा निवडणुकीच्या काळात मोठे आर्थिक निर्णय घेतल्यास राजकीय वाद निर्माण होऊ शकतो. म्हणूनच सरकार सहसा अशा काळात मोठ्या घोषणांपासून दूर राहते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

सरकारच्या प्रस्तावानुसार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीककर्जावर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा विचार आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील सुमारे ३५ ते ४० लाख शेतकऱ्यांना मिळू शकतो. याशिवाय नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या जवळपास २० लाख शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचाही प्रस्ताव आहे. या संपूर्ण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर जवळपास २७ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### शेतकऱ्यांची प्रतीक्षा आणखी वाढणार

कर्जमाफीचा निर्णय पुढे ढकलला गेल्यास शेतकऱ्यांची प्रतीक्षा आणखी वाढणार आहे. आधीच शेतीमालाला योग्य दर नसल्याने आणि उत्पादन खर्च वाढल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे सरकारने दिलेले आश्वासन प्रत्यक्षात कधी पूर्ण होणार, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. आचारसंहिता संपल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात असली, तरी तोपर्यंत बळीराजाला आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## नीट पेपरफुटीचे जाळे नागपूरपर्यंत

### नांदेड कनेक्शनमध्ये असलेला 'आलोक' CBI च्या रडारवर

### मोटेगावरच्या मुलालाही घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट-यूजी २०२६' (NEET-UG) पेपरफुटी घोटाळ्यात आता नागपूर कनेक्शन समोर आहे. या रॅकेटचा नांदेड पॅटर्न तपासताना सीबीआयच्या रडारवर आता नागपूर येथील 'आलोक' नावाचा संशयित मास्टरमाइंड आला आहे. या आलोकनेच किमान एक हजार विद्यार्थ्यांना नीटचा पेपर विकल्याचा दाट संशय केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला आहे.




दुसरीकडे, याच प्रकरणात रविवारी रात्री उशिरा लातूरच्या नामांकित 'आरसीसी क्लासेस'चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला सीबीआयने पुण्यातून अटक केली असून, विशेष न्यायालयाने त्याला ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. तर मोटेगावरच्या मुलालाही चौकशीसाठी सीबीआयने ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे.

**कोण आहे नागपूरचा 'आलोक'?**नीट घोटाळ्याच्या तपासात नागपूरच्या 'आलोक' या गूढ नावाभोवती आता सीबीआयचा फास आवळला जात आहे. सीबीआयच्या प्राथमिक चौकशीत समोर आलेले त्याचे कारनामे थक्क करणारे आहेत. आलोकने देशभरातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील जवळपास १ हजार विद्यार्थ्यांपर्यंत थेट किंवा दलालांमार्फत पेपर पोहोचवल्याचा संशय आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी आलोकने अनेक विद्यार्थ्यांना आणि पालकांना पुण्यात बोलावून घेतले होते. तेथेच गोपनीय ठिकाणी ठेवून त्यांना पेपर रटवून घेण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. आलोक हा नागपुरातील कोणत्या मोठ्या रॅकेटचा हिस्सा आहे की तो स्वत:च मुख्य सूत्रधार आहे, याबाबत सीबीआयने गोपनीयता पाळली असून त्याचा कसून शोध सुरू आहे.

**नांदेडच्या महिलेकडून आलोकचे नाव समोर**-सीबीआयच्या मुंबईतील महानिरीक्षक हर्षवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे सीबीआयचे तपासप्रमुख विनोद चौधरी यांनी नुकतीच नांदेडमध्ये धाड टाकली होती. नीट पेपरफुटी प्रकरणात नांदेडमधील हॉटेल व्यावसायिक कदम परिवाराची चौकशी केली असता 'आलोक'चे नाव समोर आले.नांदेडच्या विद्युतनगरमधील अश्विनी कदम नावाच्या महिलेने आपल्या मुलीसाठी तब्बल ५ लाख रुपयांना नीटचा पेपर खरेदी केला होता. यासाठी २५ हजार रुपये ऑनलाईन टोकन मनी म्हणून दिले गेले. त्यानंतर आलोकने या मुलीला आणि तिच्या कुटुंबीयांना १५ दिवस पुण्यात एका ठिकाणी थांबवून ठेवले आणि तिथेच तिला प्रत्यक्ष पेपर दिल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

**मोटेगावकरच्या मुलाचीही उइख चौकशी सुरू**

दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणी मुख्य संशयित शिवराज मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर, आता सीबीआयने (उइख) त्यांच्या मुलालाही चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मोटेगावकर यांच्या मुलाने यावर्षी बारावीची परीक्षा दिली असून, त्याला फुटलेल्या प्रश्नपत्रिकेचा थेट फायदा झाल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर, विविध आर्थिक व्यवहार आणि तांत्रिक दुव्यांची कसून पडताळणी केली जात आहे. सध्या शिवराज मोटेगावरच्या मुलाची पुण्यातील सीबीआय कार्यालयात चौकशी सुरू असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, अधिकृत पातळीवर उइख कडून याबाबत कोणतेही निवेदन जारी करण्यात आलेले नाही. तसेच, तपास सुरू असल्याने चौकशीतील अनेक बाबी गोपनीय ठेवण्यात आल्या आहेत.

## सुप्रीम कोर्ट म्हणाले- धोकादायक कुत्र्यांना मृत्यूचे इंजेक्शन द्या:लोकांची सुरक्षा आवश्यक

### निर्देश न पाळणाऱ्या अधिकाऱ्यावर अवमाननेचा खटला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी सांगितले की, धोकादायक आणि आजारी कुत्र्यांना इंजेक्शन देऊन मारले जाऊ शकते. लोकांच्या जीविताची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. जो अधिकारी निर्देश पाळणार नाही, त्याच्यावर अवमाननेचा खटला चालवला जावा. न्यायालयाने या प्रकरणात सर्व याचिका फेटाळून लावल्या.

न्यायालयाने हे देखील सांगितले की, केवळ राजस्थानमधील श्रीगंगानगर शहरात एका महिन्यात कुत्र्यांच्या चावण्याच्या १०८४ घटना समोर आल्या. अहवालानुसार, लहान मुलांना गंभीर दुखापती झाल्या, चेहऱ्यावर खोल जखमा झाल्या. तामिळनाडूमध्ये वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांतच कुत्र्यांच्या चावण्याच्या सुमारे २ लाख घटना नोंदवल्या गेल्या.नोव्हेंबर २०२५ मध्ये




रुग्णालये, बस स्टँड, रेल्वे स्टेशन ठिकाणांहून भटक्या कुत्र्यांना हटवण्याचे निर्देश जारी केले होते. कुत्र्यांना निवारागृहात ठेवावे आणि त्यांना परत सोडू नये, असे म्हटले होते. रस्त्यांवर कुत्र्यांना खायला घालण्यावरही बंदी घातली होती. यानंतर, श्वानप्रेमी आणि स्वयंसेवी संस्थांनी हे निर्देश रद्द करण्यासाठी अर्ज केला होता. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली.

## विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका बिनविरोध व्हाव्यात

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नागपूर**



महायुतीकडे ७५ टक्के मतदान असल्याचा दावा करत सध्या देशासमोरील सध्याचे संकट लक्षात घेता नागपूर विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी सर्व पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. राज्यातील ज्या निवडणुका बिनविरोध होऊ शकतात, त्यासाठीही पुढाकार घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते.

महायुतीच्या पारड्यात ७५ टक्के मतदान असल्याचा दावा करत सध्या देशासमोरील सध्याचे संकट लक्षात घेता ही निवडणूक बिनविरोध व्हावी, असा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील ज्या निवडणुका बिनविरोध होऊ शकतात, त्यासाठीही पुढाकार घेतला जाणार आहे. पक्षांमधील वाटाघाटी, देवाण-घेवाण आणि समन्वय समितीच्या चर्चेनंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. सर्व पक्ष सहकार्य करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## बारसू, पूर्णगड, सिंधुदुर्गात अणुऊर्जा प्रकल्प होणार

### CM फडणवीसांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालय मुंबई येथे महाराष्ट्र शासन (ऊर्जा विभाग) आणि विविध कंपन्यांमध्ये सामंजस्य करार करण्यात आले. मंत्रालयात आयोजित एका बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत विविध कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले. एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांचा समावेश आहे.

या बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र




बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

या बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## भोंदू अशोक खरात ED च्या ताब्यात



### पतसंस्था घोटाळा आणि मनी लाँड्रिंगची होणार चौकशी!

**विदर्भ प्रजासत्ताक दि .१९नाशिक:** गेल्या दोन महिन्यांपासून तुरुंगात असणाऱ्या भोंदू अशोक खरात याला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आज सकाळी ताब्यात घेतले. खरातचे आर्थिक काळे कारनामे इडी तपासणार आहे. सोमवारी सकाळी सुमारे नऊ वाजता ईडीचे विशेष पथक खरातला घेऊन मुंबईच्या दिशेने रवाना झाले. या कारवाईदरम्यान बंदोबस्तासाठी नाशिक पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. पोलिसांच्या मोठ्या व्हॅनमध्ये अशोक खरातला बसवण्यात आले होते. ईडीकडून आता अशोक खरातच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी केली जाणार असून, त्याला मुंबईतील पीएमएलए न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

## जय श्रीराम म्हणत महागाई सहन करा:संजय राऊतांचा खोचक टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांवरून शिवसेना नेते संजय राऊत यांनी केंद्र सरकार आणि भाजपावर जोरदार टीका केली आहे. वाढत्या महागाईमुळे सामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिक त्रस्त झाले असताना सरकार मात्र दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेश दौऱ्यावर असताना देशातील नागरिकांवर आर्थिक भार टाकला जात असल्याचे राऊत म्हणाले. जनतेला गरीब व्हावं लागेल आणि काही मोजक्या उद्योगपतींचे हित जपले जाईल, असा टोला त्यांनी लगावला. तसेच गौतम अदानी यांच्यावरील अमेरिकेतील खटल्यांबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित करत, मोठ्या लोकांना न्याय मिळतो, पण सामान्यांना आणि विरोधकांना न्यायासाठी संघर्ष करावा लागत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार आणि रोहिणी खडसे यांनी देखील महागाईच्या मुद्यावरुन सरकारवर टीका केली आहे.



संजय राऊत यांनी महागाईच्या मुद्द्यावरून अधिक आक्रमक भूमिका घेतली. देशात महागाई आणखी वाढणार असून मध्यमवर्गीयांमध्ये भीतीचं वातावरण तयार झालं आहे. या परिस्थितीत आर्थिक अराजक निर्माण होण्याची शक्यता आहे, असा दावा त्यांनी केला. त्यानंतर भाजपावर निशाणा साधताना, महागाई वाढली की त्यासाठी मुस्लिम किंवा पाकिस्तानला जबाबदार ठरवलं जाईल, अशी टीकाही त्यांनी केली. मग आमचे लोक कपाळाला टिळे लावून या महागाईचं स्वागत करतील आणि पुन्हा भाजपालाच मतदान करतील, असे म्हणत त्यांनी सरकारच्या राजकारणावर उपरोधिक भाष्य केले.

एकाच आठवड्यात इंधनाच्या किमती दुसऱ्यांदा वाढल्या आहेत. आता रुपया पूर्णपणे कोसळला आहे. किमती वाढल्या आहेत. यात नवीन काय आहे? हे तर घडणारच होते. जर तुम्ही भाजपचे समर्थक असाल, तर फक्त 'जय श्री राम'चा जयघोष करा; म्हणजे किमती १० रुपयांनी कमी होतील. 'जय श्री राम' म्हणा आणि सर्व काही उपलब्ध होईल, हाच तर भारतीय जनता पक्षाचा मंत्र नाही का? आमच्यासारखे लोक मात्र संघर्ष करणे, लढा देणे, निदर्शने करणे आणि आंदोलने करणे हे सुरूच ठेवतील, असेही राऊत यांनी म्हटले आहे.

## संपादकीय ......

# महागाईचे सावट

जागतिक पातळीवरील तेलाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी देशातील जनतेने खर्चात काटकसर करावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. पंतप्रधानांनी देशातील १४० कोटी जनतेला सावध केले आणि इंधन वाचवा, खाद्यतेलाचा वापर कमी करा, विनाकारण परदेश प्रवास करू नका, वर्षभर सोने खरेदी टाळा, विजेच्या वापरात बचत करा, सार्वजनिक वाहनांतून प्रवास करा, असे आवाहन केले. पंतप्रधानांनी केलेले आवाहन म्हणजे जागतिक संकटाची चाहूल आहे. देशातील जनतेचे पालक या नात्याने पंतप्रधानांनी जनतेला सावध केले. देशात पेट्रोल-डिझेल, घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडर, सीएनजीच्या किमतीत पाठोपाठ वाढ झाली.

अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यात चालू असलेल्या युद्धाच्या झळा महागाईच्या रूपाने भारतात सामान्य लोकांच्या घरापर्यंत पोहोचल्या आहेत. युद्ध २८ फेब्रुवारीला सुरू झाले. कच्च्या तेलाचे भाव भरमसाट वाढल्याने जगातील बहुतेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. जगात बहुसंख्य देशांमध्ये इंधनाच्या किमतीत यापूर्वीच ३५ ते ५५ टक्के वाढ झाली आहे. पण भारतात तुलनेने कमी व बरीच उशिरा वाढ झाली. पाच राज्यांत विधानसभा निवडणुकांचा प्रचार चालू असताना केंद्र सरकारला युद्धाच्या झळा देशात सामान्यांच्या स्वयंपाकघरात पोचतील याची आठवणही नव्हती, अशी टीका विरोधी पक्षाने केली आहे. युद्धामुळे सारे देश होरपळून निघत आहेत. अनेक देशांची अर्थव्यवस्था रुळावरून घसरली आहे. इंधनाचे दर वाढले म्हणून मोदी सरकारवर राजकीय चिखलफेक करण्याची ही वेळ नव्हे, हे विरोधी पक्षाला समजत नसेल तर हे दुर्दैव म्हणावे लागेल. जनतेला काटकसर करण्याचे आवाहन करणे, पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाला साथ देणे, महागाई नियंत्रणाखाली कशी राहील यावर उपाय सुचवणे, जनता व सरकार यांच्यात समन्वय साधणे ही भूमिका विरोधी पक्षांकडून अपेक्षित आहे. महागाईच्या जागतिक संकटाला तोंड देण्यासाठी जनतेला दिलासा देणे हेही महत्त्वाचे आहे. महागाईच्या झळा हा काही राजकारणाचा विषय नाही. राजकीय घडामोडी अद्यतने

देशातील लहान-मोठ्या शहरांमध्ये मोटारींची संख्या कित्येक लाखांमध्ये आहे. नवी दिल्ली, मुंबईसारख्या महानगरात तर मोटारींच्या झालेल्या गर्दीने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बस किंवा मेट्रोमधून प्रवास करण्याची हीच वेळ आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला तर इंधनाची मोठी बचत होऊ शकते. स्वत: पंतप्रधानांनी दिल्लीत दोनच मोटारी ताफ्यात बरोबर घेतल्या आहेत. इतरवेळी पंतप्रधानांच्या ताफ्यात पन्नास-साठ मोटारी असतात. या परंरपरेला त्यांनी स्वत:च छेद दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन दिवसांपूर्वी मुंबईत चक्क मोटार बाईकवरून विधान भवनात आले. पिंपरी-चिंचवडच्या महापौर व आयुक्त हे तर सायकलवरून कार्यालयात आले. मुख्यमंत्री पुण्याहून बंगळूरला जाताना प्रवासी विमानाने गेले. खासगी व चार्टर्ड विमानांचा वापर आता मुक्तपणे करता येणार नाही, असा आदेशच मुख्यमंत्र्यांनी काढला आहे, हे स्वागतार्ह आहे. तसेच एकाच कार्यक्रमाला एकाचवेळी अनेक मंत्र्यांनी जाणेही टाळले पाहिजे. सत्तेच्या परिघातील उच्चपदस्थांनी मोटारीचे ताफे बरोबर घेऊन फिरणे लोकांना आजघडीला आवडणार नाही. भाजपची सत्ता असलेल्या अनेक राज्यांत मंत्र्यांनी व राज्यपालांनीसुद्धा त्यांच्या ताफ्यातील सरकारी वाहनांची संख्या निम्मी केली आहे. जर स्वत: पंतप्रधान एस्कॉर्ट म्हणून त्यांच्याबरोबर एकच मोटार घेतात, मग अन्य राज्यांत मंत्र्यांना जास्त मोटारींची गरजच काय? महागाईचे मोठे संकट येऊ घातले असताना राज्यकर्ते व नोकरशहा यांनीही इंधन वापराबाबत काटकसर केली पाहिजे व जनतेला तसा आदर्श घालून दिला पाहिजे.

# 'धन्वंतरी रुग्णालय सहकारी पॅनल'चे निर्विवाद वर्चस्व

## १८ पैकी १८ सदस्य विजयी, सहकारी क्षेत्रातील तीन उमेदवार विजयी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती** जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने धन्वंतरी कोऑपरेटिव्ह हॉस्पिटल कोऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, एम.आर. क्र. २७ च्या २१ सदस्यीय संचालक मंडळासाठी निवडणूक प्रक्रिया पार पाडली. या निवडणुकीत, विविध संवर्गातील १८ सदस्यीय संचालक मंडळासाठी दोन पॅनलनी निवडणूक लढवली. सहकारी क्षेत्रासाठीही दोन पॅनलनी निवडणूक लढवली. विविध संवर्गांसाठी झालेल्या या निवडणुकीत 'धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनल'चे वर्चस्व राहिले. या पॅनलचे पहिले सहा सदस्य बिनविरोध निवडून आले. तथापि, इतर १८ सदस्यांपैकी १२ जणही बहुमताने विजयी झाल्याने, 'धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनल'च्या सदस्यांनी संचालक म्हणून पुन्हा एकदा सत्ता प्रस्थापित केली. दोन सहकार पॅनेलपैकी एका पॅनेलने दोन जागा जिंकल्या, तर दुसऱ्या पॅनेलने एक जागा जिकली. स्थानिक पोलीस पेट्रोल पंप रोडवर असलेल्या ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या सभागृहात, निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर खंबायत आणि सहायक निवडणूक अधिकारी अविनाश महाले यांच्या उपस्थितीत सोमवारी सकाळी ९ वाजता मतमोजणी प्रक्रिया सुरू झाली. मतदान केंद्र क्रमांक १ वरील मतपेट्या उघडून मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली. यावेळी पॅनेल प्रतिनिधी किवा उमेदवारांना मतमोजणी स्थळी उपस्थित राहण्याची आणि निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गातील सात जागांसाठी एकूण १३ उमेदवारांनी निवडणूक लढवली. या मतदारसंघात एकूण १,०१४ मतांची मोजणी झाली, त्यापैकी ३७ मते अवैध ठरवण्यात आली. धनवंतरी हॉस्पिटल कोऑपरेटिव्ह पॅनेलचे डॉ. प्रमोद झाडे यांनी सर्वाधिक ७३२ मते मिळवून निवडणूक जिकली, त्यांच्यापाठोपाठ अजय दातेराव (७१३), अशोक ठाकरे (६७५), ओंकार बांद (६५२), प्रताप भुयार (६४७), राजेश गोएंका (६४१) आणि गजानन राडके (६२६) त्यांचा क्रमांक होता. अजय गरोठ्या यांना १६७, संदीप जयस्वाल (२००), राजेंद्र जाजू, (३९१), कौस्तुभ ठाकरे (५११), सुधीर देशमुख (२६४) आणि पंकज राठी (३०९) यांना मते मिळाली. संस्थेच्या संचालक मंडळावर दोन जागा महिलांसाठी राखीव होत्या. निवडणुकीच्या रिंगणातील पाच उमेदवारांसाठी १,४४० मतदारांनी मतदान केले. एकूण ३९ मते अवैध ठरवण्यात आली. मतदारांनी पुन्हा एकदा धनवंतरी रुग्णालय सहकारी पॅनेलच्या महिला उमेदवार मीनल देशमुख आणि युवा स्वाभिमान पक्षाचे नगरसेवक प्रा. प्रशांत वानखेडे यांच्या पत्नी वंदना वानखेडे यांना संधी दिली. दोघींना अनुक्रमे ८०६ आणि ७३१ मते मिळाली. रिंगणातील इतर उमेदवारांमध्ये वंदना देशमुख (३७८), अपर्णा रोडे (५०७) आणि सपना शिगणे (२९) यांचा समावेश होता. विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातून अमोल घुरडे आणि अरुण बांबल रिंगणात होते. या प्रवर्गातील १,२७७ मतदारांपैकी ५९ मते अवैध ठरवण्यात आली. असे असूनही, अरुण बांबल ८४२ मते मिळवून विजयी झाले, तर अमोल घुरडे यांना केवळ ४३५ मते मिळाली.अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील दोन उमेदवारांसाठी एकूण १,२८८ मतदारांनी मतदान केले. यापैकी ४६ मते अवैध ठरवण्यात आली. असे असूनही, धनवंतरी हॉस्पिटल सहकारी पॅनेलचे प्रा. संजय खडसे यांना ७५१ मते आणि गौरव काशिकर यांना केवळ ५३७ मते मिळाल्याने,त्यांना विजयी घोषित करण्यात आले. इतर मागासवर्गीय प्रवर्गात, १,२८८ मतदारांनी दोन पॅनेलच्या दोन उमेदवारांना आणि एका अपक्ष उमेदवाराला मतदान केले. यापैकी ४८ मते अवैध ठरवण्यात आली. असे असूनही, धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनेलचे अमित गावंदे यांनी सर्वाधिक ७८७ मते मिळवून विजय मिळवला. इतर दोन उमेदवार, धनंजय भाकरे आणि घनश्याम वर्मा यांना अनुक्रमे केवळ २७८ आणि २२५ मते मिळाली. निवडणुकीचा निकाल दुपारी ४:४५ वाजता जाहीर करण्यात आला. यानंतर, धनवंतरी हॉस्पिटल सहकारी पॅनेलच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांना गुलाल लावून आणि शुभेच्छा पुष्पहार अर्पण करून, मिठाई वाटून आणि फटाके फोडून विजय साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, संस्थेच्या स्थापनेपासून सुमारे ५० वर्षांनंतर, धनवंतरी रुग्णालयात प्रथमच संचालक मंडळाच्या निवडणुका घेण्यात आल्या. यापूर्वी, पाच वर्षांसाठी निवडले जाणारे संचालक मंडळ बिनविरोध निवडून येत असे. संस्थेच्या इतिहासात प्रथमच, लोकशाही पद्धतीने निवडणूक होऊनही मागील संचालक मंडळ बहुमताने विजयी झाले.

### ६ बिनविरोध सदस्यांची नावे जाहीर

धनवंतरी सहकारी रुग्णालय, एम.आर. क्र. २७, च्या २१ सदस्यीय संचालक मंडळात, वैद्यकीय क्षेत्र सक्षम या सर्वसाधारण मतदारसंघातून धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनलचे सहा सदस्य आधीच बिनविरोध निवडून आले होते. सोमवारच्या निवडणुकीच्या निकालानंतर निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर खंबायत यांनी या सर्व उमेदवारांना बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर केले. यामध्ये डॉ. अनिल रोहनकर, डॉ. आशिष साहू, डॉ. ओ.जी. मुंधडा, डॉ. मनोज गुप्ता, डॉ. अविनाश लाहवाले आणि डॉ. स्वप्निल शिरभाते यांचा समावेश होता.

# घरून बेपत्ता तिन्ही अल्पवयीन मुली परतल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९वरूड-** मावशीच्या गावी जातो, असे सांगून घरातून बाहेर पडलेल्या एकाच कुटुंबातील तीन अल्पवयीन मुली गुढरित्या बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. याप्रकरणी मुलींच्या काकांनी दिलेल्या तक्रारीवरुन बेनोडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल होता, परंतु पोलिसांनी या मुलींचा शोध घेत तिघींनाही आपल्या घरी सुखरुप परत आणले आहे. प्राप्त माहितीनुसार, फिर्यादीच्या मोठ्या भावाच्या दोन मुली (वय १४ आणि १७वर्ष) तसेच त्यांच्या धाकट्या भावाची एक मुलगी (वय १५) अशा तिघींनी घरातून निघताना आम्ही वरुड येथे मावशीकडे जातो, असे आपल्या आजीला सांगितले होते. मात्र, बराच वेळ होऊनही त्या मावशीकडे पोहोचल्या नाहीत आणि घरीही परतल्यानाहीत. मुली घरी न परतल्याने नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला. नातेवाईक, मित्रमंडळी आणि वरुड येथील मावशीकडे चौकशी केली असता त्या तिथे पोहोचल्याच नसल्याचे समोर आले. तिन्ही मुलींचा कोणताही थांगपत्ता न लागल्याने अखेर कुटुंबाने पोलिसांत धाव घेतली. कोणीतरी अज्ञात इसमाने या तिन्ही अल्पवयीन मुलींना कशाचे तरी आमिष दाखवून किंवा फुस लावून पळवून नेले असावे, असा संशय मुलींच्या काकाने पोलीस तक्रारीत व्यक्त केला होता. याप्रकरणी बेनोडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भादंवि १३७(२) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आणि तपास ठाणेदार विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बेनोडा पोलिसांनी सुरु केला होता. दरम्यान या तिन्ही मुली नातेवाईकांकडे मिळाल्या असून तिघींनाही आपआपल्या घरी सुखरुप परत पोहचविण्यात आले आहे.

# सोयाबीनला विक्रमी दर; मात्र शेतकरी लाभापासून वंचित

**विदर्भा प्रजासत्ताक दि.१९ अमरावती-** अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनला प्रतिक्विंटल तब्बल ७,१४५ रुपयांचा दर मिळाल्याने गेल्या पाच वर्षांतील हा उच्चांकी दर ठरला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील तेजी, सोयाबीन तेलाची वाढती मागणी आणि देशांतर्गत कमी झालेली आवक यामुळे दरात मोठी वाढ झाली आहे. सध्या बाजार समितीत दररोज ८० ते १०० क्विंटल सोयाबीनची आवक होत आहे.

मात्र या दरवाढीचा प्रत्यक्ष फायदा शेतकऱ्यांना होत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. हंगामाच्या सुरुवातीला बाजारभाव ४,१०० ते ४,३०० रुपयांपर्यंत घसरल्याने अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक गरजेतून कमी दरातच सोयाबीन विकून टाकले. केंद्र शासनाने ५,३२८ रुपयांचा हमीभाव जाहीर केला असला तरी नाफेड खरेदी केंद्र सुरू होण्यात झालेला विलंब, नोंदणीतील अडचणी आणि मर्यादित खरेदी प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना



हमीभावाचाही लाभ मिळू शकला नाही.

सध्या बाजारात सोयाबीनचा दर ७,३०० रुपयांपर्यंत पोहोचला असला तरी बहुतेक शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी मालच शिल्लक नाही. त्यामुळे साठेबाज व्यापारी व सावकारच या तेजीचा फायदा घेत असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. दरम्यान, कापूस बाजारातही तेजी कायम असून कापसाला प्रतिक्विंटल ८,४०० ते ९,८५५ रुपये दर मिळत आहेत.

# समृद्धी महामार्गावर बेशिस्त वाहनचालकांना बसणार आळा,

## काय ITMS प्रणाली? जाणून घ्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर बेशिस्त वाहनचालकांवर आता कडक नजर ठेवली जाणार आहे. पुढील महिन्यापासून या महामार्गावर 'इंटेलिजन्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' कार्यान्वित होणार असून, पहिल्या टप्प्यात नागपूर ते जालना या सुमारे ३६४ किलोमीटर अंतरावर ही सेवा सुरू केली जाणार आहे. त्यामुळे वेगमर्यादा ओलांडणे, नियमभंग करणे आणि अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या घटनांवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




संपूर्ण समृद्धी महामार्गावर ही प्रणाली ऑगस्टपर्यंत कार्यान्वित केली जाणार असून, एकूण ७०१ किलोमीटर लांबीचा मार्ग या निगराणीखाली येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १६९८ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे. प्रत्येक एक किलोमीटर अंतरावर उच्च क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. तसेच केंद्रीकृत नियंत्रण कक्ष आणि सात विभागीय नियंत्रण केंद्रांच्या माध्यमातून संपूर्ण महामार्गावर सतत लक्ष ठेवले जाणार आहे.या प्रणालीद्वारे सुमारे सोळा प्रकारचे वाहतूक नियमभंग ओळखले जाणार आहेत. यात अतिवेगाने वाहन चालवणे, चुकीच्या दिशेने वाहन नेणे, वाहन चालवताना मोबाइलचा वापर करणे, सीट बेल्ट न लावणे, बोगद्यात दिवे न लावणे, फॅन्सी नंबर प्लेट वापरणे, लेन शिस्त न पाळणे, दुचाकीला महामार्गावर प्रवेश करणे, नो पार्किंगमध्ये वाहने उभी करणे आणि ओव्हरलोड वाहनांचा समावेश आहे.या यंत्रणेमुळे चौवीस तास देखरेख शक्य होणार असून, तात्काळ दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तसेच अपघाताच्या वेळी जलद मदत पोहोचवणे आणि रिअल टाइम माहितीच्या आधारे वाहतूक नियंत्रण करणे शक्य होणार आहे. प्रत्येक दोन किलोमीटरवर आपत्कालीन मदत केंद्रेही उभारण्यात आली आहेत. या नव्या व्यवस्थेमुळे समृद्धी महामार्गावरील अपघात कमी होऊन प्रवास अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध होईल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त केला आहे.

# तलावात बुडून मृत्यु झालेल्या चिमुकल्यांचा कुटुंबियांना दिली

# आ.रवि राणा यांनी खोलापुरी गेट येथे जाऊन सात्वंन भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**अमरावती शहरात नुकतीच एक अत्यंत हृदयद्रावक व दुर्दैवी घटना घडली असून संपूर्ण शहरावर शोककळा पसरली आहे. सहलीचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या खोलापुरी गेट परिसरातील चार चिमुकल्यांचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. स्व. पायल पंडित, स्व. यश काकने, स्व. सोनाली जोशी व स्व. आदित्य जोशी या निष्पाप चिमुकल्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.या अत्यंत वेदनादायी घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष तथा आमदार मा. श्री रविभाऊ राणा यांनी तत्काळ मृत बालकांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी दुःखी पालकांचे सांत्वन करत त्यांना धीर



दिला. तसेच या दुःखाच्या प्रसंगी आपण व युवा स्वाभिमान पक्ष कायम पीडित कुटुंबियांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही दिली.आमदार रविभाऊ राणा यांनी स्व. पायल पंडित, स्व. यश काकने, स्व. सोनाली जोशी व स्व. आदित्य जोशी या चिमुकल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी अशी प्रार्थना केली. या वेळी उपस्थित नागरिकांमध्येही मोठी हळहळ व्यक्त करण्यात आली. यावेळी नगरसेवक योगेश विजयकर, नगरसेविका अर्चना पांडे, नगरसेविका प्रियंका पाटने, राजा बांगडे, बबलु आठवले, अशोक पांडे, किशोर पिवाल, भुषण पाटने, राजेश अंबाडकर, दिलीप भाकरे, पंकज गायकवाड,सुरज बटोले, सोनु माकोडे, विलास पवार, चंदू गावंडे, अवि भुयार, व परीसरातील नागरीक उपस्थितीत होते.

फोटो टेलिग्राम

# शेतकऱ्यांचे मका खरेदीचे पैसे रखडले

## चुकाऱ्यांअभावी चुरणी येथील शेतकरी संकटात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९चिखलदरा:-** तालुक्यातील चुरणी केंद्रावर आदिवासी विकास महामंडळामार्फत करण्यात



आलेल्या मका खरेदीचे पैसे अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले नसल्याने २० ते २५ शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. मक्का खरेदी होऊन बराच कालावधी उलटून गेला असतानाही संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळालेले नसल्याने खरिपाची कामे थंडावली आहेत.शेतकरी बांधवांनी मोठ्या मेहनतीने मका पिकवून शासनाच्या नियमानुसार चुरणी केंद्रावर विक्री केली होती. मात्र विक्री झाल्यानंतरही पैसे रखडल्याने अनेक शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. शेतीची पुढील कामे, कर्जाचे हप्ते, घरखर्च तसेच मुलांच्या शिक्षणासाठी पैशांची अत्यंत गरज असताना पैसे न मिळाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.चुरणी केंद्रावरील अनेक शेतकरी आजही आपल्या खात्यात पैसे जमा होण्याची प्रतीक्षा करीत आहेत. वारंवार चौकशी करूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यामुळे संबंधित विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आम्ही शासनाच्या विश्वासावर मका विक्री केली, मात्र आता स्वतःच्या पैशांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली.दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर विषयाकडे लक्ष देऊन चुरणी केंद्रावरील सर्व शेतकऱ्यांचे प्रलंबित मक्क्याचे पैसे तत्काळ त्यांच्या खात्यात जमा करावे तसेच त्यांची अडचण लक्षात घेऊन प्रशासनाने लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करून न्याय द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# तीन सख्ख्या भावंडांचा धरणात बुडून मृत्यू

## वरुड तालुक्यातील पुसली धरणात घडली दुर्दैवी घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ वरुड** वरुड तालुक्यातील शेंदूरजनाघाट ते सातनूर मार्गावरील पुसली धरणात एकाच कुटुंबातील तीन सख्ख्या भावंडांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि.१८) उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत आहे.

पंकज संतुलाल उईके (वय १०), प्रिया संतुलाल उईके (वय ८), पवन संतुलाल उईके (वय ७) यांचा मृतांम ध्ये समावेश आहे. मनोहर निमकर यांच्या सातनूर येथील शेतात मागील दोन ते तीन वर्षांपासून सोकारी म्हणून काम करणारे संतुलाल उईके यांची तीन मुले उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त घरी आले होते. ही तिन्ही मुले नरखेड येथील आश्रमशाळेत शिक्षण घेत होती. रविवार, दि. १७ मे रोजी सकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास ही तिन्ही मुले आंबिया बहाराची गळलेली लहानसंत्री वेचण्यासाठी घरातून शेताकडे गेली होती. मात्र सायंकाळपर्यंत ती घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी परिसरात शोधाशोध सुरू केली. रात्री उशिरापर्यंत शोध घेऊनही मुलांचा कोणताही मागमूस लागला नव्हता.

सोमवारी दुपारी सुमारे १वाजताच्या दरम्यान पुसली धरणाच्या पाण्यावर तीनही मुलांचे मृतदेह तरंगताना आढळून आले. प्राथमिक माहितीनुसार, मुलांनी कपडे काढून धरणात आंघोळ करण्यासाठी प्रवेश केला असावा आणि पाण्याचा अंदाजन आल्याने तिघेही बुडाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकाच कुटुंबातील तीन चिमुकल्यांचा अकाली मृत्यू झाल्याने उईके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. माहिती मिळताच शेंदूरजनाघाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

### अमरावतीच्या घटनेची पुनरावृत्ती

रविवार १० मे रोजी अमरावती शहरालगत असलेल्या घातखेडा तलावात डबापार्टीकरिता गेलेल्या महाजनपुरा येथील दहापैकी चौघांचा बुडून मृत्यू झाला होता. त्यापैकी दोघे सख्खे बहीणभाऊ होते. त्यानंतर आठ दिवसांत अशीच दुर्दैवी घटना वरुड तालुक्यातील पुसली धरण परिसरात घडली. बुडालेले तिघेही सख्ख्ये बहीण-भाऊ आहेत. या घटनेमुळे ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली.

# काँग्रेसमधील गटबाजीला कंटाळून सुधाकर भारसाकडे यांचा राजीनामा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९दर्यापूर** काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजी, उमेदवार निवडीत हस्तक्षेप तसेच पक्ष संघटनेतील नियुक्त्यांमध्ये विश्वासात न घेतल्याचे सांगत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुधाकर भारसाकडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.

नगरपरिषदेच्या निवडणुकीपासूनच पक्षांतर्गत मतभेद सुरू झाल्याचा आरोप सुधाकर भारसाकडे यांनी केला आहे. आपल्या मर्जीतले तीन उमेदवार असतानाही त्यांना तिकीट देण्यात आले नाही. त्या वेळेपासूनच माझ्या मनात खदखद सुरू होती, असे त्यांनी स्पष्ट केले. नगरपरिषदेच्या कामकाजाबाबत विविध बातम्या प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध होत असल्याने मानसिक त्रास सहन करावा लागल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. ठाकरे यांना उमेदवारी दिल्यानंतर आम्ही प्रामाणिकपणे पॅनल टू पॅनल मतदान चालवले. मात्र माझ्या गटातील उमेदवाराला जाणीवपूर्वक पराभूत करण्यासाठी माझा राजकीय गेम करण्यात आला, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.यासंदर्भात वरिष्ठ नेत्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला, मात्र कुणीही म्हणणे ऐकून घेण्यास तयार नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली, पक्षात मुद्दाम गटबाजी निर्माण करून बाळासाहेब हिंगणीकर आणि माझ्यामध्ये दोन गट करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. पुढे हिंगणीकर भाजपमध्ये गेल्यानंतरही काँग्रेसचे कार्यकर्ते पक्षात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान,अलीकडेच झालेल्या ओबीसी सेल, अल्पसंख्यांक सेल तसेच अनुसूचित जाती-जमाती सेलच्या नियुक्त्यांमध्ये तालुकाध्यक्ष असूनही कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याने आपण अस्वस्थ झालो, असे त्यांनी म्हटले. या नियुक्त्या नितेश वानखेडे आणि बळवंत वानखडे यांनी केल्याचा आरोपही त्यांनी केला. आता काँग्रेसमध्ये माझ्यासाठी काम राहिले नाही. पक्ष नेतृत्वाचा माझ्यावर विश्वास उरलेला नाही. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करून मी तालुकाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असून काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे, असे सुधाकर भारसाकडे यांनी स्पष्ट केले.

# अचलपुरात 'लव्ह जिहाद'चे प्रकरण

## हिंदू नाव धारण करून मुलीवर अत्याचार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अचलपूर**

अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरात लव्ह जिहादसारखे प्रकरण पुढे आले असून आता पुन्हा एकदा खोट्या ओळखीचा डाव रचून अल्पवयीन मुलीच्या अब्रूवर घाला घालण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कपूर नावाने ओळख करून अल्पवयीन मुलीशी संबंध प्रस्थापित करणारा मोहम्मद शारीक मो. शरीफ रा. अशरफपुरा याच्या विरोधात परतवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परतवाड्यातील १५ वर्षीय मुलीला आरोपीने आधी खोटी ओळख सांगून जाळ्यात ओढले. आपण हिंदू असून कपूर आडनाव असल्याचे सांगितले. त्यानंतर ४ मे ते ८ मे दरम्यान गावातील महादेव मंदिराजवळील निर्जन शेतात नेऊन तिच्यावर अत्याचार केले. एकदा फसवल्यानंतर आरोपी इथेच थांबला नाही, तुझी बदनामी करेन अशी धमकी देऊन त्याने मुलीला गप्प केले आणि वारंवार अत्याचार केला. अखेर असह्य झाल्याने पीडितेने धीर करून आईकडे आपबीती सांगितली. आईसोबत थेट परतवाडा पोलिस ठाणे गाठले. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपीचा खरा चेहरा उघड केला. कपूर नावामागे दडलेला मोहम्मद शारीक मो. शरीफ याला बेड्या ठोकल्या आहे. या नराधमावर भारतीय न्याय संहितेच्या बलात्कार कलमासह, पोक्सो कायदा आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ६४ , ६४ (२) सहकलम ४, ६ व कलम ३७६ अन्वयेगुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

### मदत करणाऱ्यानाही सोडणार नाही !



मी परतवाडा ठाणेदारांशी बोललो. आरोपीवर कडक कारवाई केली जाईल. त्याला मदत करणारे आणखी असेल तर त्यांना सोडल्या जाणार नाही. शहरात घडलेली घटना निंदनीय असून या लव्ह जिहाद संदर्भात हिंदूंची जनजागृतीही करू. **-आमदार प्रवीण तायडे**

# धुळघाट, बारुखेडा परिसरात वाघाचे दर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९धारणी-** धुळघाट रेल्वे आणि बारुखेडा या दोन गावा दरम्यान दररोज पट्टेदार वाघाचे दर्शन पर्यटक व प्रवाशांना होत आहे. मदमस्तपणे वाघोबा चालताना लोकांना दिसला खरा, मात्र मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या कर्मचार्यांचे दुर्लक्ष वाघासाठी धोकादायक होऊ शकते.

धारणी ते अकोट मार्गावर रेल्वे धुळघाट ते बारुखेडा (उजाड) दरम्यानच्या जंगलात मोठ्या आरामाने शतपावली करताना वाघाचे दर्शन अनेकांना झाल्याने अकोट प्रवास धोक्याचा झालेला आहे. धारणी तालुक्यातून अकोट, तेल्हारा, शेगाव जाण्यासाठी धुळघाट-झरी मार्ग जवळचा मानला जातो. या मार्गानेच अकोट बाजारासाठी किंवा दवाखान्यासाठी लोक जातात. रेल्वे धुळघाट दरम्यान असलेले रेल्वे तलई गाव आता उजाड असून बारुखेडा पण पुनर्वसित झाल्याने हा भाग वन्य जीवांसाठी स्वर्ग ठरत आहे.

बारुखेडाजवळ एक नाला असून वन्य प्राण्यांचा संचार येथे नियमित असतो. अकोट, हिवरखेड आणि झरी जाणार्यांनी वाघाला निर्भेळपणे फिरताना पाहिले. दररोज वाघ दिसत असला तरी मेळघाटवाल्यांनी प्रवास करणे सोडलेले नाही. चार चाकी वाहनांनी प्रवास करणारे तर चक्क व्हिडीओ काढत आहेत.

धुळघाट ते अकोट मार्गावर दरम्यान असलेल्या बारुखेडा व झरी या दोन भागाच्या जंगलात सतत वाहनांची वर्दळ असते तर वन्य प्राणी पण मोठ्या संख्येत असतात. व्याघ्र प्रकल्पाच्या धुळघाट व वान या वनपरिक्षेत्रात सांबर, बिबट, अस्वल, हरिण दिसणे काही नवल मानले जात नाही. मात्र, आता वाघ दररोज एकाच मार्गावर दिसत असल्याने वन्य प्राण्यांच्या जीवाला धोका संभव आहे. वाघ जरुर फिरत आहे. मात्र, व्याघ्र प्रकल्पाचे कर्मचारी जंगलातून फिरत नसल्याने अनुचित घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# खरिपात सोयाबीन, कापूस पिकाचे क्षेत्र वाढणार


## कृषी विभागाचा अंदाज; चांदूरबाजार तालुक्यात शेतीकामांना वेग

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१९ चांदूरबाजार,** मृग नक्षत्राला अवघे २० दिवस शिल्लक राहिले असताना चांदूरबाजार तालुक्यात खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला आहे. शेतशिवारात मशागतीची कामे अंतिम टप्प्यात पोहोचत असून बियाणे, खते व कीटकनाशकांच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग वाढली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आर्थिक जुळवाजुळव करण्यात व्यस्त असून कृषी विभागानेही खरीप हंगाम २०२६-२७ साठी पीक नियोजन निश्चित केले आहे. यंदा तालुक्यात सोयाबीन आणि कापूस पिकांच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

तालुका कृषी विभागाने तयार केलेल्या प्रस्तावित पेरणी आराखड्यानुसार तालुक्यातील सरासरी पेरणी क्षेत्र ४५ हजार २९३ हेक्टर आहे. त्यापैकी यंदा ४३ हजार १९८ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून हे प्रमाण सुमारे ९५.३० टक्के इतके आहे. या नियोजनात ज्वारीसाठी ९८ हेक्टर, तुरीसाठी १० हजार ८५० हेक्टर, मूग ५० हेक्टर, उडीद ५० हेक्टर, सोयाबीन १४ हजार ८०० हेक्टर, कापूस १७ हजार २०० हेक्टर तर इतर पिकांसाठी १५० हेक्टर क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा विशेषतः सोयाबीन व कापूस



पिकांच्या क्षेत्रात वाढ होणार असल्याचे कृषी विभागाच्या नियोजनातून स्पष्ट होत आहे. मागील वर्षी ज्वारीचे ६७ हेक्टर, तुरीचे ९ हजार ३५० हेक्टर, मूग ३६ हेक्टर, उडीद ४५ हेक्टर, सोयाबीन १४ हजार ७५३ हेक्टर तर कापूस १६ हजार ४१२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. यंदाच्या नियोजनात कापसाच्या क्षेत्रात जवळपास ८०० हेक्टरपेक्षा अधिक वाढ अपेक्षित आहे. सोयाबीनलाही शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.दरम्यान, खरीप हंगाम सुरळीत पार पडावा यासाठी कृषी विभागाने बियाण्यांचेही नियोजन सुरू केले आहे. विभागाच्या माहितीनुसार सोयाबीन बियाण्यांचा ११ हजार १०० क्विंटल साठा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

त्याचबरोबर तूर बियाणे १ हजार ६२७.५० क्विंटल, मूग ७५० क्विंटल, उडीद ७५० क्विंटल, कापूस ४३० क्विंटल तसेच ज्वारीचे ९.८० क्विंटल बियाणे उपलब्ध ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना वेळेत व दर्जेदार बियाणे मिळावे यासाठी कृषी विभागाकडून तयारी करण्यात येत आहे.

तालुका कृषी अधिकारी प्रवीण मोहोड यांनी शेतकऱ्यांना प्रमाणित बियाण्यांचाच वापर करण्याचे आवाहन केले आहे. तसेच पेरणीयोग्य पाऊस झाल्याशिवाय घाईने पेरणी करू नये, असा सल्लाही त्यांनी दिला आहे. हवामानातील बदल लक्षात घेता शास्त्रशुद्ध पद्धतीने पेरणी केल्यास उत्पादन वाढीस मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तालुक्यातील बहुतांश शेतकरी सध्या ट्रॅक्टरद्वारे नांगरणी, वखरणी आणि शेत मशागतीची कामे करताना दिसत आहेत. कृषी केंद्रांवरही बियाणे व खतांच्या चौकशीसाठी गर्दी वाढत आहे. पावसाचे आगमन वेळेत झाल्यास यंदाचा खरीप हंगाम समाधानकारक ठरण्याची अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# विषय पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी

## समान कामासाठी समान वेतन तत्त्वाची अंमलबजावणी करा; प्राथमिक शिक्षक समितीचे शासनाला निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती :**उच्च प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत विषय पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी (एस-१४) लागू करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाकडे केली आहे. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने समान कामासाठी समान वेतन या तत्त्वाची अंमलबजावणी करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.शिक्षण विभागाच्या १४ नोव्हेंबर १९७९ च्या शासन निर्णयानुसार उच्च प्राथमिक वर्गासाठी पदवीधर शिक्षकांची पदे निर्माण करण्यात आली होती. त्यानंतर शिक्षण हक्क कायदा २००९ अंतर्गत इयत्ता सहावी ते आठवीसाठी विषयनिहाय तीन पदवीधर शिक्षकांची पदे अस्तित्वात आली. मात्र शासनाने केवळ ३३ टक्के शिक्षकांनाच पदवीधर वेतनश्रेणी देण्याचा निर्णय घेतल्याने अनेक शिक्षकांवर अन्याय झाल्याचा आरोप शिक्षक समितीने केला आहे.राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक समितीने शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन पाठविले आहे. याबाबत माहिती राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.दरम्यान, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ८ मे २०२६ रोजी दिलेल्या निर्णयात १३ ऑक्टोबर २०१६ चा शासन निर्णय भेदभावपूर्ण असून भारतीय संविधानाच्या कलम १४ चे उल्लंघन करणारा असल्याचे नमूद केले आहे. तसेच पात्र विषय पदवीधर शिक्षकांना नियुक्ती दिनांकापासून पदवीधर वेतनश्रेणी देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.याच पार्श्वभूमीवर सर्व विषय पदवीधर शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने एस-१४ वेतनश्रेणी लागू करून थकबाकी अदा करावी, तसेच भविष्यात न्यायालयीन वाद टाळण्यासाठी स्पष्ट शासन निर्णय तातडीने जारी करावा, अशी मागणी शिक्षक समितीने केली आहे.

# ४६ अंशांच्या उन्हात रस्त्यावर तडफडणाऱ्या आजोबांना मिळाला माणुसकीचा आधार

## प्रभात चौकातून निराधार वृद्धाचे आधार केंद्रात पुनर्वसन; अमरावतीत पुन्हा जिवंत झाली संवेदनशीलता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती :**

शहरातील वाढते तापमान, कडक उन्हाचा तडाखा आणि त्यात भर दुपारच्या वेळी रस्त्यावर एक निराधार वृद्ध जीव मुठीत धरून पडलेला...

प्रभात टॉकीजजवळचे ते दृश्य पाहून अनेकांच्या काळजाचा ठाव घेतला. सोमवारी दुपारी सुमारे दोन वाजताच्या सुमारास ४६ अंश सेल्सिअस तापमानात एक वृद्ध व्यक्ती अक्षरशः थरथरत रस्त्याच्या कडेला पडून होती. अंगावर फाटके कपडे, शरीरावर धूळ-मळाचा थर आणि डोळ्यांत असहाय्यता... जणू आयुष्यानेच त्यांना रस्त्यावर टाकून दिले होते.ही अवस्था पाहून परिसरातील एका संवेदनशील व्यावसायिकाने तातडीने आधार केंद्राला संपर्क साधला.

व्यक्तीची प्रकृती अत्यंत गंभीर आहे, काहीही अनर्थ होऊ शकतो, अशी माहिती देत मदतीची विनंती करण्यात आली. फोन मिळताच अमरावती महानगरपालिकेच्या एक हात मदतीचा या उपक्रमांतर्गत कार्यरत असलेली आधार केंद्राची टीम कोणतीही वेळ न दवडता घटनास्थळी पोहोचली.कडक उन्हात भाजणाऱ्या रस्त्यावरून त्या वृद्धाला काळजीपूर्वक उचलून केंद्रात आणण्यात आले. मात्र केंद्रात आल्यानंतर समोर आलेले चित्र आणखी वेदनादायी होते. त्या व्यक्तीने कदाचित अनेक वर्षांपासून आंघोळ केली नसावी, इतका मळ त्यांच्या अंगावर साचला होता. शरीरावर जवळपास २०० ग्रॅम मळाचा थर जमा झाला होता. दुर्गंधी, अशक्तपणा आणि अस्वच्छतेमुळे त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली होती.अशा परिस्थितीतही आधार केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी कुठलीही किळस किंवा तक्रार न करता माणुसकीचा हात पुढे केला. केंद्राचे संचालक राजीव बसवनाथे, व्यवस्थापक ज्योती राठोड आणि काळजीवाहक रोहित घोंगडे यांनी स्वतः पुढाकार घेत त्या आजोबांना स्वच्छ आंघोळ घातली, अंगावरील घाण साफ केली, नवीन कपडे दिले आणि त्यांना प्रेमाने जेवणही दिले.काही तासांपूर्वी रस्त्यावर मृत्यूची वाट पाहणारे तेच आजोबा आता स्वच्छ कपड्यांत, शांत चेहऱ्याने आणि सुरक्षित वातावरणात दिसत होते. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि डोळ्यांत आलेले अश्रू उपस्थित प्रत्येकाला भावूक करून गेले. आपलेपण ही भावना किती मोठा आधार असते, याची जाणीव या घटनेतून पुन्हा एकदा झाली. अमरावती महानगरपालिका आणि पब्लिक एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेला एक हात मदतीचा हा उपक्रम केवळ सेवा नसून समाजातील उपेक्षितांसाठी जगण्याची नवी आशा ठरत आहे. रस्त्यावर बेवारस अवस्थेत जगणाऱ्या निराधारांना निवारा, अन्न, उपचार आणि सन्मान देण्याचे कार्य हे केंद्र सातत्याने करत आहे.आजच्या स्वार्थी आणि धावपळीच्या जगात माणुसकी अजूनही जिवंत आहे, याचे जिवंत उदाहरण प्रभात चौकातील या घटनेने पुन्हा एकदा दाखवून दिले.

# अमरावतीत आता 'पाटील लॉबी विरुद्ध राणा' चर्चा रंगली

## विधान परिषद निवडणुकीत पाहायला मिळणार जोरदार राजकीय टशन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती** गेल्या जानेवारी महिन्यात झालेल्या महापालिका निवडणुकीनंतर स्थानिक राजकारणात एनडीएतील 'पाटील लॉबी' आणि राणा दाम्पत्य यांच्यातील मतभेदांची चर्चा राजकीय वर्तुळात चांगलीच रंगली होती. आता आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या संघर्षाने आणखी तीव्र स्वरूप धारण केल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यात सध्या 'पटेल लॉबी विरुद्ध राणा दाम्पत्य' अशीच राजकीय परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा सुरू आहे.राजकीय वर्तुळात असे बोलले जात आहे की, आपल्या जुन्या राजकीय मतभेदांमुळे आमदार रवी राणा हे भाजप नेते व माजी मंत्री प्रवीण पोटे यांना पराभूत करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

त्याचप्रमाणे भाजप खासदार डॉ अनिल बोंडे, आमदार राजेश वानखडे, माजी मंत्री प्रवीण पोटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय खोडके तसेच शिंदे गटाचे नेते व माजी मंत्री बच्चू कडू हे राणा दाम्पत्याविरोधात एकत्र आल्याचे बोलले जात आहे.विशेष म्हणजे, राणा दाम्पत्याच्या विरोधात उभे असलेले बहुतांश नेते 'पटेल लॉबी'शी संबंधित मानले जातात. याशिवाय इतर काही पक्षांतील पटेल लॉबीशी जवळीक असलेले नेते देखील प्रवीण पोटे यांना विधान परिषदेत पाठविण्यास इच्छुक असल्याची चर्चा आहे.

त्यामुळे सध्या भाजप नेत्या नवनीत राणा आणि त्यांचे पती आमदार रवि राणा हे जिल्ह्याच्या राजकारणात काहीसे एकटे पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आगामी विधान परिषद निवडणुकीत हा राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ..जर आज नवनीत राणा खासदार असत्या तर; मेळघाटवासीयांचा प्रशासनावर संताप

## जिल्हाधिकारी कार्यालयात दिवसभर ठिय्या आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**
अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील नागरिकांना आजही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. धारणी तालुक्यातील हतरु गावातील महिला आणि नागरिकांनी विविध समस्यांच्या निराकरणासाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. मात्र सकाळपासून सायंकाळपर्यंत प्रतीक्षा करूनही कोणतेही ठोस उत्तर किंवा निर्णय न मिळाल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला.



हात्रू गावातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ सकाळीच आपल्या मागण्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले होते. गावातील पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, आरोग्य सुविधा, वीजपुरवठा आणि शासकीय योजनांचा लाभ न मिळणे अशा विविध प्रश्नांवर त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र दिवसभर विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडे पाठवापाठवी सुरूच राहिल्याचा आरोप नागरिकांनी केला.हा विषय आमच्याकडे नाही, त्या विभागाशी संपर्क करा, उद्या या, अशी उत्तरे देत अधिकाऱ्यांकडून जबाबदारी झटकली जात असल्याने नागरिक अधिकच संतप्त झाले. अनेक महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेरच बसून ठिय्या आंदोलन सुरू केले. प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत त्यांनी आपल्या समस्या तत्काळ सोडवण्याची मागणी केली.यावेळी काही महिलांनी थेट माजी खासदार नवनीत राणा यांचे नाव घेत नाराजी व्यक्त केली. आज नवनीत राणा खासदार असत्या तर आम्हाला इतका त्रास सहन करावा लागला नसता. आमच्या समस्या किमान ऐकून घेतल्या गेल्या असत्या, अशी भावना महिलांनी व्यक्त केली. या वक्तव्यानंतर परिसरात चर्चेला उधाण आले.मेळघाट हा आदिवासी आणि दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो. मात्र आजही या भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, रस्ते आणि प्रशासनाकडून वेळेवर प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप सातत्याने होत आहे. अनेक वेळा निवेदने देऊनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.दिवसभर प्रतीक्षा करूनही समाधानकारक निर्णय न मिळाल्याने महिलांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जर लवकरात लवकर त्यांच्या मागण्यांवर कार्यवाही झाली नाही तर येत्या काळात अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल. दरम्यान, मेळघाटातील मूलभूत प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी आता पुन्हा जोर धरू लागली आहे.

# रानडुकराच्या हल्ल्यात दोन जखमी

## ममदापूर शिवारात भीतीचे वातावरण..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ तिवसा** तिवसा तालुक्यातील ममदापूर शेत शिवारात आज दि. १९ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ७.३० वाजताच्या सुमारास जंगली रानडुकराने केलेल्या हल्ल्यात दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांकडून वनविभागाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ममदापूर येथील अल्पभूधारक शेतकरी दिवाकर प्रल्हादराव टेकाडे (वय ३९) हे आपल्या शेतात खरीपपूर्व तयारीसाठी साफसफाईचे काम करत असताना मागून आलेल्या रानडुकराने अचानक हल्ला चढविला. या हल्ल्यात रानडुकराने त्यांना जोरदार धडक देत जमिनीवर पाडले व काही अंतरापर्यंत फरफटत नेले. या घटनेत त्यांच्या छाती व पायाला गंभीर दुखापत झाली असून ते जखमी झाले आहेत.दरम्यान, याच परिसरात दुसरी घटना घडली असून तिवसा येथील महिला मजूर पद्माबाई कोंडे (वय ४५) या वणी येथील शेतात कापूस वेचत असताना रानडुकराने त्यांच्यावरही अचानक हल्ला केला. यात त्या देखील जखमी झाल्या आहेत.दोन्ही जखमींना तात्काळ उपचारासाठी उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, तिवसा येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.या सलग घटनांमुळे ममदापूर व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वारंवार होत असलेल्या रानडुकरांच्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून वनविभागाने तत्काळ लक्ष देऊन रानडुकरांचा बंदोबस्त करावा व जखमींना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# ३१ मे रोजी आकाशात 'ब्लू मून'चा नजारा

## नावात 'ब्लू' पण चंद्र दिसणार पांढराच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती :**
येत्या ३१ मे रोजी आकाशात एक दुर्मीळ खगोलीय घटना घडणार आहे. या दिवशी महिनाभरातील दुसरी पौर्णिमा असून, या चंद्राला खगोलशास्त्रात 'ब्लू मून' असे संबोधले जाते. विशेष म्हणजे, अशा प्रकारच्या घटनेची पहिली नोंद सन १५२८मध्ये झाली होती. जेव्हा महिन्याची पहिली पौर्णिमा १ किंवा २ तारखेला येते, तेव्हा त्याच महिन्याच्या शेवटी दुसरी पौर्णिमा येण्याची दाट शक्यता असते. या मे महिन्यात पहिली पौर्णिमा १ मे



रोजी झाली असन आता ३९ मे रोजी दसरी'ब्लू मून' म्हणजे चंद्र निळा दिसेल, असा अनेकांचा समज असतो. परंतु, प्रत्यक्षात चंद्र इतर पौर्णिमेसारखाच शुभ्र पांढरा दिसतो. केवळ एकाच महिन्यात दोन पौर्णिमा येतात, म्हणून दुसऱ्या चंद्राला हे विशेष नाव देण्यात आले आहे.अवकाशातील नैसर्गिक कोणत्याही घटनेकडे अंधश्रद्धेतून पाहू नये, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे विभागिय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक 'विजय गिरुलकर यांनी केले आहे.-

# विधान परिषद निवडणूक, जिल्ह्यात आचारसंहिता लागू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९ अमरावती,**भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात अमरावतीचा



समावेश असल्याने मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तातडीने लागू करण्यात आली आहे.अमरावती जिल्ह्यामध्ये स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे.निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार, २५ मे २०२६ रोजी अधिसूचना जारीकरणे, १ जूनरोजीनामांकने (उमेदवारी अर्ज) दाखल करण्याची अंतिम तारीख, २ जून रोजी नामांकनांची छाननी, ४ जूनरोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख, १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत मतदान, २२ जून रोजी मतमोजणी, २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख आहे.-

# औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहिर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती,** - अखिल भारतीय औषधी विजेता संघटनेच्या वतीने बुधवार, दि. २० मे रोजी देशव्यापी एक दिवसीय औषधविक्री बंदची घोषणा करण्यात आली आहे. या बंदमुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने हेल्पलाईन क्रमांक जाहिर केले आहे. बंदच्या काळात जिल्ह्यातील नागरिकांनी अत्यावश्यक औषधांचा पुरवठा अखंडीत व सुरळीत उपलब्ध राहावा, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केली आहे.

सहआयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने, तसेच २४ तास सुरु असणाऱ्या औषध दुकानांनी समन्वय साधण्यात येत आहे. यात अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होणार नाही यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.औषध उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास नागरिकांनी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले ओ. अन व औषध प्रशासन, अमरावती कार्यालया हेल्पलाईन क्रमांक - गजानन घीरके, सहायक आयुक्त (औषधे) वाशिम, अमरावती-९८५०१५०६८७, मनिष गोतमारे, औषध निरीक्षक, वाशिम, अमरावती ९५५२५७४४९५, तालुकानिहाय आपत्कालीन औषध उपलब्धता हेल्पन्नाईन क्रमांक - अमरावती शहर - प्रविण देशमुख ९४२२१५८४०९, संजय बोबडे ९४२२१५७६१५, सौरभ मालानी ९४२३८१२३४५, मनोज डफळे ९८२३२०५२५०, राजा नानवाणी ९८२२६४३२२६ येथे संपर्क साधावा, असे आवाहन सह आयुक्त (औषधे) करण्यात मि. कृ. काळेश्वरकर यांनी केले आहे.

# वाढत्या उष्णतेचा प्रभाव; पोट, मूत्रसंस्था विकारांत वाढ

## निर्जलीकरण, चुकीचा आहार आणि फास्ट फूडमुळे नागरिक त्रस्त; काळजी घेण्याचा सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**
जिल्ह्यातील तापमान आणि उकाड्यात सातत्याने वाढ होत असून, त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. विशेषतः पचनसंस्था, गुदद्वार आणि मूत्रसंस्थेशी संबंधित आजारांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. उन्हाळ्यात शरीरातून घामाद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी आणि क्षार बाहेर पडत असल्याने निर्जलीकरणाची समस्या निर्माण होते. पुरेसे पाणी न पिणे, दूषित अन्नपाण्याचे सेवन, उघड्यावर मिळणारे पदार्थ खाणे, अनियमित आहार आणि व्यायामाचा अभाव यांमुळे पोटदुखी, ॲसिडिटी, जुलाब, बद्धकोष्ठता, मूत्रमार्गातील संसर्ग तसेच गुदद्वाराशी संबंधित विकार वाढत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. खानपानातील बदल, अपुरी झोप आणि अयोग्य जीवनशैलीमुळे समस्यांमध्येही वाढ होत आहे. मुलांमध् मूळव्याधीच्य चुकीचा आहार, कमी पाणी पिणे आणि फास्टफूडचे वाढते सेवन यांमुळे गुदरोगांचे प्रमाण वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**सामान्य तक्रारी कोणत्या?**- अशक्तपणा, चक्कर येणे, डोकेदुखी, भूक मंदावणे, बद्धकोष्ठता, लघवी कमी होणे, जास्त घाम येणे, शरीरात उष्णता वाढणे या सामान्य तक्रारी आहेत. दूषित अन्नपाणी, बाहेरील उघडे पदार्थ, तिखट-तेलकट आहार, अनियमित जेवण, कमी पाणी पिणे आणि संसर्ग यांमुळे पचनसंस्थेशी संबंधित विकार वाढतात.

# वृद्धांची फरपट थांबणार, ॲपवरून हयातीचे प्रमाणपत्र काढता येणार 'सत्यापन' ॲपला मान्यता

## संजय गांधी आणि श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती-** संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजनेच्या लाखो वृद्ध, दिव्यांग व गरजू लाभार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. दरवर्षी हयातीचे प्रमाणपत्र (लाइफ सर्टिफिकेट) सादर करण्यासाठी बँका आणि सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणाऱ्या वृद्धांची फरपट आता कायमची थांबणार आहे.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य सरकारने आता 'बेनिफिशियरी सत्यापन ॲप' (बीएसए) द्वारे घरबसल्या हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या सुविधेला अधिकृत मान्यता दिली आहे. या डिजिटल सुविधेमुळे तंत्रज्ञानाच्या एका क्लिकवर लाभार्थ्यांची शासकीय कार्यालयांतील चक्रांतून सुटका होणार आहे.


या नावीन्यपूर्ण योजनेला वृद्ध नागरिकांकडून अतिशय चांगला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### अंगणवाडी सेविकांना मिळणार प्रशिक्षण

हे ॲप ग्रामीण व दुर्गम भागातील लाभार्थ्यांपर्यंत सहज पोहोचावे आणि त्याचा वापर कसा करावा, याचे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्ह्यात लवकरच 'मास्टर ट्रेनर्सची नियुक्ती करण्यात येणार आहे. हे ट्रेनर्स गावागावात जाऊन अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, ग्रामसेवकांना या ॲपचे प्रशिक्षण देतील, जेणेकरून ते लाभार्थ्यांना ही सुविधा उपलब्ध करून देऊ शकतील.

### आता ॲपवरून घरबसल्या काढा हयात प्रमाणपत्र

राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नव्या 'बेनिफिशियरी सत्यापन सोय झाली आहे. मोठी




### विविध योजनांसाठी हयात प्रमाणपत्र बंधनकारक

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना यांसारख्या विविध सामाजिक साहाय्य योजनांचा लाभ निरंतर सुरू राहण्यासाठी लाभार्थ्यांना दरवर्षी आपले हयातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असते. हे प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्यास अनेकदा लाभार्थ्यांचे मानधन तांत्रिक कारणास्तव थांबवले जाते.-

स्मार्टफोनच्या माध्यमातून या ॲपवर लाभार्थ्यांचा चेहरा स्कॅन करून किंवा आवश्यक बायोमेट्रिक तपशील भरून काही मिनिटांतच हयातीचे प्रमाणपत्र काढता येईल. रांगेत उभे राहण्याची गरज पडणार नाही.